REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 8 | MAY - 2018

# “वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदू व समायोजन पातळीचा अभ्यास”



**प्रा. पी. बी. दरुरे**
**महिला महाविद्यालय, कराड.**

- **प्रस्तावना (Introduction) –**

**नियंत्रण केंद्र (Locus Of Control) –**

रॉटर यांनी व्यक्तीच्या अंतर्गत व बहिर्गत नियंत्रण केंद्राचे मापान करण्यासाठी अंतर्गत बहिर्गत नियंत्रण केंद्र चाचणी विकसित केली. सामाजिक अध्ययन सिद्धांताच्या आधारे याची निर्मिती झाली आहे. अंतर्गत निर्धारणा याचा अर्थ अशा व्यक्ती स्वतःच्या यशासाठी स्वतःवर विश्वास ठेवतात, त्याला परिश्रमाची जोड देतात, स्व-कर्तुत्वावर विश्वास ठेवतात, यशासाठी ते नशिबावर अवलंबून राहत नाहीत तर बहिर्गत निर्धारणा असणारी व्यक्ती तिला प्राप्त झालेले यश हे नशिबामुळे, योगायोगाने मिळाले आहे, हे इतरांमुळेच शक्य झाले अशा विचारांची असते. नशीब, योगायोग, संधी या गोष्टीवर विश्वास ठेवते. आपल्या कृतीसाठी इतर कोणीतरी मदत करत आहत, अशी यांची समजूत असते.

वैवाहिक समायोजन, मानसिक आरोग्य, दर्जा अशा विशिष्ट गोष्टींच्या मापनासाठी या चाचण्यांचा वापर करण्यात येतो, तसेच अंतर्गत नियंत्रण केंद्रित व्यक्तींची वैशिष्ट्ये आणि बाह्य नियंत्रण केंद्री व्यक्तीची वैशिष्ट्ये वेगवेगळी असतात. हा भेद मापण्यासाठी Locus Of Control किंवा नियंत्रण केंद्र चाचणी मांडत करते.

**समायोजन (Adjustment) –**

दैनंदिन व्यवहारात जमवून घेणे, मिळते-जुळते घेणे, तडजोड करणे, समजून उमजून वागणे इ. शब्दप्रयोग वापरले जातात. या सर्वांनाच समायोजन असे म्हणतात.

सभोवतालच्या वातावरणाशी मिळते-जुळते घेण्याची समस्यात्मक परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी स्वतः मध्ये व परिस्थितीमध्ये योग्य ते बदल घडवून आणण्याची क्षमता म्हणजे समायोजन होय अशी सामायोजानाची व्याख्या करता येईल.

**समायोजन प्रक्रियेच्या पुढील अवस्था आहेत -**

**१. प्रेरणा -**

समायोजन प्रक्रियेचा प्रारंभच मुळात प्रेरणेपासून होतो सामायोजनाची समस्या एखाद्या गरजेची पूर्तता न झाल्यामुळे निर्माण होत असते. ती समस्या सोडविण्यासाठी गरज जितकी तीव्र असेल तितकी प्रेरणा त्याच गरजेची पूर्तता करण्यासाठी निर्माण होईल.

**२. समस्यापूर्ती प्रयत्न -**

प्रेरणेची किंवा गरजेची निर्मिती झाल्यानंतर समस्यांच्या पूर्ततेसाठी प्रयत्नांची शिकस्त केली जाते.

३. अडथळे -

व्यक्तीसमोर उपलब्ध असणाऱ्या अनेक पर्यायांमाधून नेमके कोणते पर्याय सामायोजनासाठी उपयुक्त ठरू शकतात याबाबत अनेक अडथळे निर्माण होतात.

४. अपयश -

व्यक्तीला विविध प्रयत्न करूनही नोकरीच्या मागणीतील अडथळे दूर करण्यात अपयश येते. निर्माण झालेले अडथळे दूर करणे आपल्या कुवतीच्या आवाक्याच्या बाहेरचे आहे असे व्यक्तीला वाटू लागते. मात्र त्यावेळी नोकरीची गरज, आवश्यकता तीव्रतेने जाणवत असते.

५. विफलता -

प्रेरणा पूर्तीच्या मागील अडथळे निर्माण झाल्यानंतरच विफलतेची भावना निर्माण होते.

६. प्रत्यक्ष वर्तन -

व्यक्ती विफलतेने ग्रासल्यामुळे पुन्हा नोकरीच्या भागांतील अडथळे दूर करून अपयश टाळण्यासाठी व अपयशातून निर्माण होणाऱ्या विफलतेवर मात करण्यासाठी विविध मागणी बहु विध प्रयत्न वर्तन करत असते

७. अडथळे निर्मुलन -

नोकरी मिळाल्यानंतर त्या व्यक्तीने पुन्हा-पुन्हा प्रयत्न केल्यानंतर त्या नोकरी मिळवण्याच्या समस्येची पूर्तता होते. यालाच समस्यापुर्ती असे म्हणतात.

समायोजनाच्या प्रकारात कौटुंबिक समायोजन व सामाजिक सामायोजान अशा दोन प्रकारांचा प्रामुख्याने समावेश होतो.

नियंत्रण केंद्र आणि लिंगभेदन यांच्यातील फरक -

अंतर्गत नियंत्रण केंद्र असणाऱ्या व्यक्ती उच्च ध्येयसिद्धीची प्रेरणा, समायोजित, कामी चिंताग्रस्त, आत्मविश्वासू, जबाबदार, प्रयत्नशील, पुढाकारवृत्ती, कृतीशील, स्व-नियंत्रित, यशस्वी, अंधश्रद्धेवर विश्वास नसणाऱ्या किंवा कमी असणाऱ्या, स्वक्षमता व कौशल्यावर विश्वास असणाऱ्या, निश्चिती, कार्यकेंद्रित व उपयोगी स्वरूपाच्या असतात. स्त्रियांच्या तुलनेत पुरुष हे जास्त प्रमाणात अंतर्गत नियंत्रण केंद्र या प्रकारात मोडतात.

बहिर्गत नियंत्रण केंद्र असणाऱ्या व्यक्ती या ध्येय सिद्धीची प्रेरणा कमी, चिंताग्रस्त, आत्मविश्वासाचा अभाव, देववादी, अनुसारिता उच्च, अपयशी, उच्च अनुपालन, अंधश्रद्धेवर विश्वास असणाऱ्या, आरोग्याविषयक नकारात्मक अभिवृत्ती असणाऱ्या, पुढाकार वृत्तीचा अभ्यास असणाऱ्या असतात. पुरुषांपेक्षा स्त्रिया यां बाह्य नियंत्रण केंद्र या प्रकारात जास्त मोडतात.

- उद्दिष्टे (Objectives) –

१. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदू बाबत ग्रामीण व शहरी भेद अभ्यासणे.
२. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समायोजनाबाबत ग्रामीण व शहरी भेद अभ्यासणे.
३. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदू लिंगभेद अभ्यासणे
४. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समायोजनाबाबत लिंगभेद अभ्यासणे.

- अभ्युपगम (Hypothesis) –

१. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदू याबाबत ग्रामीण व शहरी भेद दिसून येईल

२. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदू लिंगभेद दिसून येईल

३. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समायोजनाबाबत ग्रामीण व शहरी भेद दिसून येईल.

४. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समायोजन याबाबत लिंगभेद दिसून येईल

- **संशोधनाचा हेतू (Purpose of Research) –**

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदू व सामायोजनाबाबत ग्रामीण व शहरी भेद दिसून येतो का? त्याचबरोबर लिंगभेदाबाबत ही नियंत्रण केंद्रबिंदू व सामायोजानात भेद आढळून येतो का? हे पाहण्यासाठी प्रस्तुत सुरवात केली.

**संशोधन पद्धती (Research Method)**

**नमुना (Sample) –**

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदू व समायोजन पातळी यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी महिला महाविद्यालय कराड मधीलव एस. जी. एम महाविद्यालयातील १०० विद्यार्थ्यांची निवड केली. त्यापैकी ग्रामीण भागातील २५ विद्यार्थी व ३५ विद्यार्थिनी तसेच शहरी भागातील २५ विद्यार्थी व २५ विद्यार्थिनींची निवड केली.

**मापन साधने (Measuring Tools) –**

या संशोधनासाठी डॉ. आर. एन. सिंग यांची नियंत्रण केंद्रबिंदूची व डॉ डी. एन. श्रीवास्तव व डॉ. गोविंद तिवारी यांनी समायोजन सूची चाचणी वापरली. नियंत्रण केंद्रबिंदू चाचणीत विधाने आहेत तसेच समायोजन चाचणीत ८० विधाने आहेत. या दोन्ही चाचणीत २ पर्याय आहेत त्यातील जो पर्याय योग्य वाटेल त्या पर्यायासमोर बरोबर ☐ अशी खून करावयाची आहे. प्रस्तुत चाचणी हिंदी भाषेत आहे

- **कार्यपद्धती -**

**अ. संख्याशास्त्रीय विश्लेषण (Statistical Analysis) –**

प्रयुक्तांना प्राप्त झालेल्या कच्च्या गुणांकावर खालील पद्धतीने संख्याशास्त्रीय विश्लेषण केले.

१. मध्यमान (Mean)

२. प्रमाण विचलन (Standard deviation)

३. 't' मूल्य.

**ब. परिवर्तके (Variables) –**

अ. स्वतंत्र परिवर्त्य- १. लिंग - ( मुले/मुली )
२. संस्कृती- (ग्रामीण-शहरी)

ब. परतंत्र परिवर्त्य- १. नियंत्रण केंद्रबिंदू
२. संयोजन.

- **संशोधन फलिते** (Interpretation of Result) –

**तक्ता क्र.१-**

**वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदूचे मध्यमान, प्रमाण विचलन व 't' मूल्य दर्शविणारा तक्ता-**

| समूह (Group) | नमुना (N) | मध्यमान (Mean) | प्रमाणविचलन (SD) | मुक्तीप्रमाण (df) | 't' मूल्य 't'Value | सार्थकता पातळी Significant level |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ५० | १४.९३४ | ४.४६ | ९८ | ०.००२ | Not Significant |
| शहरी | ५० | १४.६७२ | ४.७८ | | | |

**तक्ता क्र.२ -**

**वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या नियंत्रण केंद्रबिंदूचे मध्यमान, प्रमाण विचलन व 't' मूल्य दर्शविणारा तक्ता-**

| समूह (Group) | नमुना (N) | मध्यमान (Mean) | प्रमाणविचलन (SD) | मुक्तीप्रमाण (df) | 't' मूल्य 't'Value | सार्थकता पातळी Significant level |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | ५० | १४.६१२ | ४.२५ | ९८ | १.२९८ | Not Significant |
| विद्यार्थिनी | ५० | १४.६०६ | ४.४३ | | | |

**तक्ता क्र.३ -**

**वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या सामायोजनाबाबत मध्यमान, प्रमाण विचलन व 't' मूल्य दर्शविणारा तक्ता-**

| समूह (Group) | नमुना (N) | मध्यमान (Mean) | प्रमाणविचलन (SD) | मुक्तीप्रमाण (df) | 't' मूल्य 't'Value | सार्थकता पातळी Significant level |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ५० | ५४.१२२ | ११.८५ | ९८ | ०.१७ | Not Significant |
| शहरी | ५० | ५३.६८५ | १३.३८ | | | |

**तक्ता क्र.२ -**

**वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या समायोजनाबाबत मध्यमान, प्रमाण विचलन व 't' मूल्य दर्शविणारा तक्ता-**

| समूह (Group) | नमुना (N) | मध्यमान (Mean) | प्रमाणविचलन (SD) | मुक्तीप्रमाण (df) | 't' मूल्य 't'Value | सार्थकता पातळी Significant level |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | ५० | ५८.८०१ | ११.०० | ९८ | ०.६९४ | Not Significant |
| विद्यार्थिनी | ५० | ५७.१४६ | १२.८६ | | | |

- **चर्चा आणि अन्वयार्थ (Discussion and Interpretation)-**

**वरिष्ठ महाविद्यालयातीलविद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदू व समायोजन पातळीचा अभ्यास करणे ही प्रस्तुत संशोधनाची समस्या होती.**

**रॅाटर यांनी व्यक्तीच्या अंतर्गत व बहिर्गत नियंत्रण केंद्राचे मापन करण्यासाठी नियंत्रण केंद्र चाचणी विकसित केली. अंतर्गत निर्धारणा याचा अर्थ अशा व्यक्ती स्वतःच्या यशासाठी स्वतःवर विश्वास ठेवतात, स्व-कर्तुत्वावर विश्वास ठेवतात, परिश्रमाची जोड देतात तर बहिर्गत निर्धारणा असणारी व्यक्ती यश हे नशिबामुळे, योगायोगाने मिळाले आहे हे इतरांमुळेच झाले अशा विचारांची असते. अशा या दोन्ही प्रकारच्या व्यक्ती या दैनंदिन व्यवहारात कशा प्रकारे जमवून घेतात, तडजोड कशी करतात. हे जाणून घेणे महत्वाचे आहे. सोभोवतालच्या वातावरणाशी मिळते-जुळते घेणे सकारात्मक परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी स्वतःमध्ये व परिस्थितीमध्ये योग्य ते बदल घडवून आणण्याची क्षमता म्हणजे समायोजन होय. प्रस्तुत संशोधनामध्ये वरील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा नियंत्रण केंद्रबिंदू व समायोजन याबाबत व लिंगभेद अभ्यासण्यासाठी प्रस्तुत संशोधन हाती घेतले**

**तक्ता क्र.१-**

**यामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदूचा भेद दर्शविला आहे ग्रामीण भागातील ५० विद्यार्थ्यांच्या प्राप्तांकाचे मध्यमान १४.९३४ व प्रमाण विचलन ४.४६ तर शहरी भागातील ५० विद्यार्थ्यांच्या प्राप्तांकाचे मध्यमान १४.६७२ व प्रमाण विचलन ४.७८ व मुक्तीप्रमाण ९८ इतके आले. या दोन्ही मध्यमानातील फरकाचे 't' मूल्य ०.०२ इतके आले. त्यमुळे दोन्ही मध्यमानामध्ये लक्षणीय भेद दिसत नाही. यावरून वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदू याबाबत ग्रामीण व शहरी भेद दिसूनआला नाही.**

**तक्ता क्र. २-**

**यामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा नियंत्रण केंद्रबिंदूबाबत भेद दर्शविला आहे ५० विद्यार्थ्यांच्या प्राप्तांकाचे मध्यमान १४.६७२ व प्रमाण ४.२५ तर ५० विद्यार्थिनींच्या प्राप्तांकाचे मध्यमान १४.६.६, प्रमाण विचलन ४.४३ इतके आले व मुक्तीप्रमाण ९८ इतके आले. या दोन मध्यामानातील फरक ०.०६६ इतका आला आणि त्याचे 't' मूल्य १.२९८ इतके आले. सांख्यिकीयदृष्ट्या ०.०५ या पातळीवर लक्षणीय भेद दिसून आला नाही. यावरून, वरीष महाविद्यालायातील विद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदूबाबत लिंगभेद दिसून आला नाही असे दिसते**

**तक्ता क्र. ३-**

**यामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या समायोजन पातळीतील भेद दर्शविला आहे. ५० ग्रामीणविद्यार्थ्यांच्या प्राप्तांकाचे मध्यमान ५३.६८५ व प्रमाण विचलन १३.३८ व मुक्तीप्रमाण ९८ इतका आला. या दोन्ही मध्यमनातील फरक ०.४३७ इतका आला आहे त्याचे 't' मूल्य 0.17 इतके आले. सांख्यिकीदृष्ट्या ०.०५ या पातळीवर दोन्ही मध्यमानामध्ये लक्षणीय फारक दिसून येत नाही, यावरून वरिष्ठ माहाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समायोजन घटकाबाबत ग्रामीण व शहरी भेद दिसून आला नाही.**

**तक्ता क्र. ३-**

**यामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समायोजन घटकाबाबत लिंग भेद दर्शविला आहे ५० विद्यार्थ्यांच्या प्राप्तांकाचे मध्यमान ५८.८०९, प्रमाण विचलन ११.०० तर ५० विद्यार्थिनींच्या प्राप्तांकाचे मध्यमान ५७.१४६, प्रमाण विचलन १२.८६ व मुक्तीप्रमाण ९८ इतके आले. 't' मूल्य ०.६९४ इतके आले. यावरून, वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समायोजन घटकाबाबत लिंगभेद दिसून आला नाही म्हणजे हा अभ्युपगम**

**सांख्यिकीयदृष्ट्या ०.०५ या पातळीवर सार्थ ठरला नाही. म्हणजेच वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समायोजन घटकाबाबत लिंगभेद दिसून आला नाही**

- **निष्कर्ष (Condusion) –**

**१. वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदू याबाबत ग्रामीण व शहरी भेद दिसून आला नाही.**

**२. वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या नियंत्रण केंद्रबिंदू याबाबत लिंगभेद दिसून आला नाही.**

**३. वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या समायोजनाबाबत ग्रामीण व शहरी भेद दिसून आला नाही.**

**४. वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या समायोजनाबाबत लिंगभेद दिसून आला नाही**

- **मर्यादा (Limitation) –**

**१. प्रस्तुत संशोधानासाठी मर्यादित प्रमाणात संख्याशास्त्राचा वापर करण्यात आला आहे त्यामुळे प्राप्त निष्कर्ष मोठ्या समूहालालागू पडत नाहीत.**

**२. मोठा नमुना घेतल्यास निष्कर्ष वेगळे येवू शकतात**

**३. संशोधन पूर्ण करण्यासाठी वेळेची मर्यादा होती**

**४. कमी वेळात संशोधन पूर्ण करायचे असल्याने कार्यात अडचणी निर्माण झाल्या**

- **संदर्भ ग्रंथ (Reference book) –**

**१. डॉ. आर. जे. दांडगे (प्रभारी कुलसचिव २००९) "मानसशास्त्रीय मापन", शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय, कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक १४८.**

**२. मंगल एस. के. (२००५) "मानसशास्त्रीय संख्याशास्त्र आणि शिक्षण", दिल्ली.**

**३. प्रा. तंबाके व प्रा. तडसरे (२००४), "उपयोजित मानसशास्त्र", फडके प्रकाशन कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक ५३, ५४.**

**४. प्रा. वि. दि. तडसरे, "मानसशास्त्र", पृष्ठ क्र. १२४ ते १२८.**

**५.** Garret Henry E. (1981) Statistics in Psychology and Education, 10 th Edition.